|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University , Jalgaon**

## राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/ रासेयो /प्रदिस- ११/ १५७ /२०२६ दि. ०९/०६/२०२६

### दरपत्रक मागणी आवाहन

**प्रति,**

------------------------

------------------------

----------------------

**विषय :-** राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत प्लास्टिक थर्माकोल कचरा मुक्त दिंडी, हरित वारी - निर्मल वारी- स्वच्छ वारी-स्वस्थ वारी अभियान (निसर्गवारी) सहभागी रासेयो स्वयंसेवकांसाठी टि शर्ट व टोपी पुरविण्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

**महोदय / महोदया,**

आपणास सूचित करण्यात येते की, संत मुक्ताई संस्था, मेहुण ता.मुक्ताईनगर व श्रीसंत सद्‌गुरु सखाराम महाराज तिर्थक्षेत्र, अमळनेर / पंढरपुर यांच्या आषाढी एकादशीच्या वारीमध्ये स्वयंप्रेरणेने सहभागी विद्यार्थी स्वयंसेवकांना अंदाजी ३०० स्वंयसेवकांना **टि शर्ट व टोपी** देण्यात येणार आहे.सदर पूरवठा करण्यास आपण इच्छूक असल्यास साहित्याचे प्रतिनग दराचे दरपत्रक ( कोटेशन ) बंद पाकीटात दि. १६/०६/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत संचालक,राष्ट्रीय सेवा योजना या नावाने **डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विद्यार्थी भवन,रासेयो विभाग, कबचौउमवि, जळगाव** येथे जमा करावे.

| तपशिल | साहित्य पुरवठा संख्या | दर (सर्व करांसह) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| टि शर्ट व टोपी | २०० | | |

सदरचे दरपत्रक दि. १६/०६/२०२६ रोजी सायंकाळी ०४.३० वाजता विद्यापीठ कार्यालयात उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती**

१) खरेदीची अंदाजित रक्कम रु.--------- आहे

२) विद्यापीठात खरेदी करावयाचे साहित्य हे विद्यापीठात प्रत्यक्ष पोहोचकरुन द्यावयाचे आहे.

३) दर सादर करतांना भाडे,पॅकिंग,फिटींग तसेच इतर प्रासंगीक खर्च विचारात घेऊन दर सादर करावेत. एकापेक्षा जास्त मेक आणि मोडेल साठी किंमती द्यावयाच्या असल्यास वेगवेगळया द्याव्यात तसेच Warrnateee / Guarantee नमुद करुन त्याचे कार्ड मालाच्या पुरवठासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) आवश्यकता भासल्यास पुरवठादारांना प्रत्यक्ष विद्यापीठात उपलब्ध नमुन्याची पाहणी करता येईल्.आवश्यक असेल तेथे पडताळणीसाठी नमुना (sample) जोडावा लागेल.

५) दरपत्रकात मागणी केलेल्या साहित्यातील संख्या कमी /अधिक करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

६) दरमागणीपत्रातील तपशिलात बदल करण्याचा,रद्दकरण्याचा,दुरुस्ती करण्याचा,तसेच आलेले दरपत्रकनाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

७) अग्रीम स्वरुपात कुठलीही रक्कम मिळणार नाही.तसेच सशर्त दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

८) पुरवठादारने पॅनकार्ड,उद्यम / शॉप अॅक्टनोंदणीपत्र तसेच GST प्रमाणपत्र जोडणे आवश्यकआहे.GST मध्ये नोंदणी नसल्यास,त्याचे कारणासहित घोषणापत्र (Declaration) द्यावे.

९) देयके सादर करतांना विद्यापीठाचा GST No.27AAAJNO465A1ZLचा उल्लेख करुन पक्के बिल द्यावे लागेल, GSTशासकिय खात्यात भरणा करीत असल्याचा पुरावा म्हणून मागील महिन्याचा GSTR- 3B सोबत जोडावा.त्यातील नियमितता पाहुनच बिलाची अदायगी करण्यात येईल किंवा GSTची रक्कम राखून उर्वरित देयकाची अदायगी करण्यात येईल.GSTची रक्कम 2A पडताळणी केल्यानंतर अदाकरण्यात येईल.

१०) साहित्याच्या / सेवेच्या गुणवत्तेमध्ये फरक आढळल्यास बिलाची अदायगी करण्यात येणार नाही.

११) खरेदी आदेश / कार्यादेश दिल्यानंतर पुरवठादारने वस्तू / सेवेचा विहित कालावधीत पुरवठा केला नाही,तर सदर वस्तू / सेवा व्दितीय क्रमांकाने किमान दर सादर करणाऱ्या पुरवठादारांकडून खरेदी करण्यात येईल.अश्या परिस्थितीत विद्यापीठाला आर्थिक नुकसान सहन करावे लागल्यास त्याची नुकसान भरपाई आपणा कडून करुन घेण्यात येईल.तसेच आपल्या आस्थापनेचे नाव पुरवठादारांच्या काळया यादीत टाकण्यात येईल.

१२) संबधीत विभागाकडून वस्तू / सेवा समाधानकारक मिळाल्याचा अहवाल वित्त विभागात सादर झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत बिल अदायगी करण्यात येईल्.आवश्यक असेल तेथे शासकीय करकपात करण्यात येतील.

१३) सदरचे सीलबंद दरपत्रक हे पुरवठादाराच्या लेटरहेडवर सही व शिक्क्यानिशी सर्वकरांसह दर नमुद करुन **संचालक, राष्ट्रीय सेवा योजना** यांचे नावे **राष्ट्रीय सेवा योजना विभाग,डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन,कबचौ उमवि,जळगाव** कार्यालयात **दि.१६/०६ /२०२६** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत सादर करावे.

१४) दर मागणी पत्रकात काही बदल झाल्यास अथवा वेळेत वाढ दिल्यास त्याची सूचना ही शुध्दीपत्रक म्हणून विद्यापीठाचे पोर्टल www.nmu.ac.inवर प्रसिध्द करण्यात येईल.त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१५) प्राप्त दरपत्रकांतून केवळ किमान दर नमूद केलेल्या पुरवठादाराशीच संपर्क करण्यात येईल.त्यामुळे दर नमुद करतांना अवास्तव दर नमूद करु नयेत.

१६) दरपत्रकासंदर्भात अतिरिक्त माहितीसाठी प्रा. डॉ. प्रविण नरहर महाले, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना मो.नं.९८२३१ ९२८३१ ऑफीस नं.०२५७-२२५७३४९ वर कार्यालयान वेळेत संपर्क साधावा.

१७ ) पुरवठादाराने सदरचा नमुना आपल्या सही शिक्क्यानिशी आपण सादर करित असणाऱ्या दरपत्रकासोबत उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत या करिता जोडून पाठविणे आवश्यक आहे.

**( प्रा. डॉ. प्रविण नरहर महाले )**
**संचालक,राष्ट्रीय सेवा योजना**

मला / आम्हाला उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत.

पुरवठादारची सही व शिक्का

मो.नं.--------------

प्रतिलिपी :-

१)मा.वित्त व लेखा अधिकारी,कबचौउमवि,जळगाव

२)मा.पध्दती विश्लेषक,संगणकशास्त्र प्रशाळा,कबचौउमवि.जळगाव कृपया सदर दरपत्रक मागणीस संकेतस्थळावर अपलोड करण्याची प्रक्रीय करावी